प्रकरण तिसरे

# 'वैजयंता' कादंबरीतील स्त्रीस्वरुप विचार

# प्रकरण तिसरे

# 'वैजयंता' या कादंबरीतील स्त्री स्वरूप विचार

## ०१. प्रस्तावना :

दुसऱ्या प्रकरणात 'चंदन' कादंबरीतून व्यक्त झालेल्या कामगारांच्या दु:ख, वेदना यांचे विवेचन केले. या प्रकरणात तमाशा कलावंतांचे प्रश्न मांडणाऱ्या अण्णा भाऊ साठे यांच्या 'वैजयंता' कादंबरीचा स्त्री विचार स्वरुपाच्या दृष्टीने करावयाचा आहे.

'प्रतिभासंपन्न शाहीर व 'आधुनिक लोकनाट्याचे जनक' म्हणून अण्णाभाऊंच्या साहित्याची ख्याती मराठी वाङ्मयाच्या विश्वात सर्वदूर पसरलेली आहे. मराठी कादंबरीचे विश्वही त्यांनी आपल्या कादंबरी लेखनाने समृद्ध केले आहे. नायक, नायिका, तसेच घटनांना प्राधान्य देणाऱ्या अनेक कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. त्यातील नायिकाप्रधान कादंबऱ्यातील स्त्रीरुपाच्या आविष्काराचा अभ्यास करताना काही कादंबऱ्या ज्या निवडलेल्या आहेत त्यातील 'चंदन' नंतर 'वैजयंता' ही त्यांची कादंबरीही एका उपेक्षित जीवनाची कथा व व्यथा मांडणारी कादंबरी आहे.

अण्णाभाऊ स्वत: एक लोककलाकार म्हणून उदयास आल्यानंतर कलेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या कलाकारांचे, लोककलेच्या आश्रयाने जगणाऱ्या विशेषता स्त्रियांचे जीवन, कलाकाराच्या जीवनातील समस्या त्यांनी पाहिल्या, भोगल्या आणि अनुभवल्याही होत्या, त्यामुळेच या अशा स्त्रीचे जीवन हा त्यांच्या आस्थेचा विषय होता. अशा या कलाकार स्त्रीचे जीवन आविष्कृत करणाऱ्या कादंबरीचा अभ्यास कथानकाच्या आधारे करताना कादंबरीतील स्त्रीरुप-विचार, व्यक्तिरेखांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष, तमाशा कलावंतांचे दु:ख, त्यातून उद्धृत झालेले स्त्रीविश्व आणि अण्णाभाऊंच्या आस्थेचा विषय म्हणून संपृक्त झालेली स्त्री या मुद्यांच्या आधारे प्रस्तुत कादंबरीचा अभ्यास करुन या सर्वांचा मागोवा घेण्याचे प्रयोजन प्रस्तुत प्रकरणात योजिले आहे.

वास्तवता, कलात्मकता व यांच्यातून कादंबरीला आलेली स्वयंपूर्णता या वैशिष्ट्यांच्या आधारेही कादंबरीचे परिशिलन करणे हे ही येथे क्रमप्राप्त ठरणार आहे. ही वैशिष्टये ज्यायोगे कादंबरीमध्ये येऊ शकतात ती कादंबरीकार अण्णा भाऊ साठे यांची साहित्यिक भूमिका यातून तपासून पाहता येते. तसे पाहता अण्णाभाऊंच्या इतर कादंबऱ्यांप्रमाणेच त्यांची ही कादंबरीसुद्धा केवळ कल्पनेने निर्माण केलेली नाही तर, या कादंबरीतील भावानुभूतीला वास्तवाची जोड आहे. तमाशा या कलेला वाहून घेतलेल्या 'वैजयंता' च्या चित्रणाची वैविध्यपूर्णता, त्यातील दाहक वास्तवता व कलेकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा व्यक्त झालेला आहे, याचा विचार इथे प्रस्तुत आहे.

## ०२. अण्णाभाऊंची साहित्यिक भूमिका :

कलेला प्रतिष्ठा मिळावी व त्याचबरोबर कला जगणाऱ्या स्त्रियांचे जीवन हे सामाजिक स्तरावर उन्नत व्हावे, अशा आत्मिक तळमळीनेच त्यांनी 'वैजयंता' ही तमाशा कलेवर बेतलेली कादंबरी लिहिली आहे.

कादंबरीला सुरुवात करण्याअगोदरच अण्णाभाऊ तशा प्रकारची साहित्यिक भूमिका मांडतात ती अत्यंत महत्त्वाचीही आहे.

''जो कलावंत जनतेची कदर करतो, त्याचीच कदर जनता करते हे मी प्रथम शिकून मगच लेखन करीत असतो. माझा माझ्या देशावर, जनतेवर नि तिच्या संघर्षावर अढळ विश्वास आहे. देश सुखी, समृद्ध व्हावा नि सभ्य व्हावा, येथे समता नांदावी आणि या महाराष्ट्र भूमीचे नंदनवन व्हावे अशी मला रोज स्वप्ने पडतात. ही मंगल स्वप्ने पहात-पहात मी लिहित असतो. केवळ कल्पकतेचे कृत्रिम डोळे लावून जीवनातील सत्य दिसत नसते. तर ते सत्य हृदयाने मिळवावे लागते. डोळ्याने सर्वच दिसते पण ते सर्व साहित्यिकांना हात देत नाही, दगा मात्र देते. माझा असा दावा आहे की, ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांचे तळहातावर तरली आहे. त्यामुळे त्या दलितांचे जीवन तितक्याच प्रामाणिकपणे निष्ठेने मी चित्रित करणार आहे नि करीत आहे.''[१]

इतक्या स्पष्ट शब्दात 'वैजयंता' कादंबरीच्या प्रस्तावनेत अण्णाभाऊंनी आपली भूमिका मांडली आहे आणि त्या भूमिकेशी ते सदैव प्रामाणिक राहिले. प्रस्तावनेच्या शेवटी, वैजयंताच्या तमाशासारखा तमाशा आज पहायला मिळत नाही अशी व्यथाही त्यांनी मांडली आहे.

एकूणच अण्णाभाऊंच्या विपुल साहित्यसंपदेवर नजर फिरविली तर त्यांच्या साहित्याचे केंद्र उपेक्षित, दुर्लक्षित माणूस असल्याचेच दिसून येते. या दृष्टिनेच दुर्लक्षित कलावंतांचे प्रश्न, समस्या त्यांनी मांडल्या.

## ०.३ अण्णाभाऊ साठे यांची तमाशाविषयीची भूमिका :

अण्णाभाऊ साठे यांनी तमाशाविषयीची आपली भूमिका मांडलेली आहे. 'वैजयंता' या कादंबरीमध्ये हाच विषय त्यांनी यशस्वीपणे हाताळलेला आहे. ते तमाशाविषयी लिहिताना म्हणतात की, ''तमाशा हा महाराष्ट्राचा राष्ट्रीय कलाप्रकार आहे. काव्य आणि कला यांचे एक चिरंतन इंद्रधनुष्य त्या शाहिरानं उभारुन ठेवलं आहे परंतु, इंग्रजी कारकीर्दीत तमाशा जनतेपासून दुरावला. नवा बदल त्यानं स्वीकारला नाही नि जुन्या शृंगाराचा त्याग केला नाही त्यामुळे प्रतिष्ठितांना त्याचे स्वरुप नापसंत झाले. तमाशा आणि तमासगीर उपेक्षित झाले. अगदी नाकाला पदर लावायची

पाळी आली त्याचवेळी कनातीचे मालक व कंत्राटदार यांनी तमाशा थिएटरात कोंडला नि त्याचं पूर्ण वाटोळं केल नव्हे त्या थोर कलेचा कडेकोट केला परंतु, जोपर्यंत तमाशा कनातीबाहेर येत नाही तोपर्यंत त्याला सुधारण्यात कोणाला यश येईल असे वाटत नाही असा हा तमाशाचा प्रश्न मी या कादंबरीत हाताळण्याचा प्रयत्न करणार आहे.[२]

तमाशाविषयीची ही अण्णाभाऊंची भूमिका पाहिल्यानंतर त्यांचे द्रष्टेपण पुढील वीस वर्षात सिद्ध झाल्याचे दिसते. तमाशा या कलेचा झपाट्याने ऱ्हास होत आहे याचे कारण म्हणजे, कंत्राटदारांची मक्तेदारी हेच होय. हे अण्णाभाऊंच्या दूरदृष्टीचेच द्योतक आहे.

'तमाशा' या महाराष्ट्र कलेने महाराष्ट्रात जेव्हा स्पृश्यास्पृश्य भेदाने उग्र स्वरुप धारण केले होते, तेव्हाही या महाराष्ट्राला एकत्र बांधून ठेवले. वेगवेगळ्या जातीचे तमासगीर एका फडात तमाशा खेळत होते; एका पंक्तीला जेवत होते.

अशी ही सामाजिक ऐक्याचा मूर्त संदेश देणारी महाराष्ट्र कला सुधारण्याचा त्यातील दुर्गुणांना बंदी घालून तो जेव्हा कनातीबाहेर आणून जनतेची कला जनतेमध्ये सादर केली जाईल तेव्हा तमाशा या कलेला व त्यात काम करणाऱ्या तमासगिरांनाही प्रतिष्ठा प्राप्त होईल व मनोरंजनाबरोबर प्रबोधनाचेही कार्य कलात्मक अंगाने करता येईल. याच दृष्टीने पुढे अण्णाभाऊंनी तमाशाला लोकनाट्याचे स्वरुप दिले असावे असे वाटते.

## ०.४ 'तमाशा' कलेचा उत्कट आविष्कार :

तमाशाचा प्रश्न 'वैजयंता' या कादंबरीत हाताळण्याचा प्रयत्न करताना अण्णाभाऊंनी 'तमाशा'या कलाप्रकाराचा उत्कटपणे आविष्कार केलेला दिसून येतो. म्हणूनच अण्णाभाऊ स्वतःच म्हणतात की, ''वैजयंताच्या तमाशासारखा तमाशा आज थेटरात नाही... त्यामुळे 'वैजयंता' वाचूनच त्यांनी (रसिकांनी) तमाशा पहावा.''[३]

वैजयंता पायांत पैंजण बांधून महाराष्ट्र कलेचा – तमाशाचा लौकिक द्विगुणित करीत असताना अण्णांना दिसली होती. त्यामुळे अण्णांच्या इतर कादंबऱ्यांप्रमाणेच ही सुद्धा कादंबरी वास्तवानुभूतीवर आधारीत आहे हे लक्षात येते. विशाल हृदयाचा हुंकार असलेला, महाराष्ट्राला चिरपरिचित असा नाद म्हणजे तमाशा. तमाशा म्हटल्यानंतर गण, गौळण, वग अशी तमाशाची तिन्ही अंगे रसिक श्रोत्यांच्या प्रत्ययास येतात. त्याच कलेला अण्णांनी या कादंबरीमधूनच अत्यंत जीवंतपणे आपल्यासमोर उभे केलेले आहे.

मथुरेच्या बाजाराला निघालेल्या गवळणी त्यांना आळविण्याचे काम केले जाते. गंगू सोंगाड्या कृष्णाचा दोस्त पेंद्या होऊन आडवा येतो. दोन्ही हात आडवे पसरुन तो म्हणतो,

"ए कुठं निघालीस एवढ्या कुन्ह्यात ?"

'मथुरेच्या बाजाराला !" वैजयंता जगातील सारा आनंद आपल्या चेहऱ्यावर आणीत म्हणाली,

"राधाबाई पुढं गेली, मी जात आहे ---"

"असं का ?" गंगू डाफरुन म्हणतो.

"अगं पर, सेलटॅक्स भरलास का ?"

वैजयंता म्हणते, "माल विकण्यापूर्वी सेलटॅक्स, हा रं कुठला कायदा ?"

गंगू म्हणाला, "ए कायदेवाली ! --- "

"आमच्या राज्यात कायदा हमाली करतो - हे तुला ठावं हाय का ?"

प्रथमच मथुरेच्या बाजाराला निघालेल्या वैजयंताला "सेल्स टॅक्स म्हणजे जकात आणि जकात म्हंजी चारशे-वीस."[४] (पृ. क्र. ३)

अशी गणानंतर गौळण व नंतर वग परसू सादर करतो आणि फक्कड लावणीला सुरुवात होते आणि प्रेक्षक हळूच कलेच्या दुनियेत विलीन होतात. ही सर्व तमाशांची चौकट अण्णाभाऊंनी तमाशाचा मूळ बाज कायम ठेवून रचली.

पुढे वैजयंता साधी गवळण होऊन नदीवर पाणी भरायला जाते आणि तिथे परसू व गंगू येऊन दाखल झालेले असतात. राजकुमारीच पाण्याला आल्याचे त्यांना आश्चर्य वाटते. वैजयंताला विचारले जाते,

"खरं - देवाच्यानं तुम्ही कोण ?"

"मी वैजयंता--", वैजयंता त्यांना म्हणाली,

"आता सांगा, तुम्ही कोण ?"

आणि तेव्हाच परसूनं वग संपवून आवाज टिपेला लावून लावणी सुरू केली -

"गाव आमचं सातारा शहर । राहतो देशावर
नावाचा आवाज तुझ्या आला ।
आम्ही आलो आशा करुन । हेतु धरुन सांग आम्हांला।"[५] (पृ. क्र.४)

अशाप्रकारे, खटकेबाज संवादरुपात सादर होणारी ही कला तिच्या सुंदर रुपासह अण्णाभाऊंच्या या कादंबरीत पहायला मिळते. म्हणूनच, अशा या महाराष्ट्राला चिरपरिचित नादाचा तमाशा कलेचा त्यांनी केलेला उत्कटाविष्कार कादंबरीच्या गुणवैशिष्ट्यांमध्ये, वेगळेपणामध्ये भरच टाकतो. यापुढेही कादंबरीच्या मूळ कथानकाच्या आधारे कादंबरीतील सर्व अंगांची वेगवेगळ्या दृष्टिकोनातून मांडणी करता येते.

## ०.५ अण्णाभाऊंनी केलेले तमाशाचे 'लोकनाट्य' रुपांतरण :

अण्णाभाऊंनी प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे तमाशा पाहताना अगदी नाकाला पदर लावण्याची वेळ आली तेव्हा मोरारजी देसाईंच्या शासनाने अण्णांच्या तमाशावर बंदी घातली. त्यानंतर तमाशाऐवजी 'लोकनाट्य' असे नाव देवून अण्णांनी लाखो श्रोत्यांसमोर लोकनाट्य सादर केले. [६]

केवळ 'लोकनाट्य' हे नावच तमाशाला न देता त्यातील पारंपरिक तमाशाच्या रुपामध्ये कालानुरुप बदल केला. तमाशातील कालबाह्य झालेले घटक वगळून त्यांनी आपल्या सामाजिक, आर्थिक, राजकीय अशा शोषणमुक्त समाजबांधणीच्या विचारांशी सुसंगत केवळ ठरेल अशा प्रकारचा बदल करुन नव्या लोकनाट्याची निर्मिती केली.

तमाशाचा आशय बदलून त्याच्या आविष्कारातही आमूलाग्र बदल केला. पारंपरिक गणाच्या लावणीत गणपतीला केले जाणारे नमन अण्णाभाऊंच्या विचारसरणीत बसणारे नव्हते म्हणून गणेश नमनाच्या जागी कामगार, देशभक्त, कष्टकरी, शेतकरी यांना वंदन केले. हा मूळ बदल त्यांच्या साम्यवादी व्यापक विचारधारेवर आधारित होता. कल्पनेतील पात्रांपेक्षा वास्तव जीवनातील पात्ररचना आणून शोषण करणारा आणि त्याला बळी पडणारा यांच्यातील संघर्ष, काळाबाजार, अन्नधान्य टंचाई, महागाई, दैन्य, दारिद्रय आणि कर्जबाजारीपणा असे प्रचलित विषय त्यांनी आपल्या बहुतांशी लोकनाट्यात आणले.

अण्णाभाऊंच्या लोकनाट्याचे आणखी एक विशेष म्हणजे त्यांनी पारंपरिक तमाशातील 'सोंगाड्या' या पात्राला पूर्णपणे फाटा दिला आणि त्याठिकाणी वर्गजागृत 'धोंड्या' या नव्या पात्राची निर्मिती केली, व ही लोकनाट्य स्वतः सादर करुन जनतेचे रंजन व प्रबोधन केले. त्यांच्या अंतरीतील गरिबांबद्दलचा जिव्हाळा त्यांच्या लोकनाट्यांमधून दिसून येतो म्हणूनच, ''धनदांडग्यांकडून होणारी पिळवणूक, शोषण व त्यापासून गरिबांचे संरक्षण करणे हा त्यांच्या लोकनाट्याचा उदार व व्यापक हेतू दिसून येतो.''[७]

अण्णाभाऊंनी आपल्या बहुतेक सर्वच तमाशात जुन्या तमाशातील झगडा या लावणी प्रकाराचा उपयोग अत्यंत कुशलतेने केला आहे. पूर्वीच्या तमाशात झगडा हा राधाकृष्ण, आषुक-माषुक, प्रिया-प्रियकर यांच्यात जो व्हायचा तो झगडा (संगीत सवाल जबाब) राबणारा आणि पिळणारा अशा दोन वर्गप्रतिनिधिंच्या तोंडी घातला.

अत्यंत काटकसरीने वापरलेले मोजके शब्द अण्णाभाऊंनी लिहिलेल्या या झगड्यात अनेक वेळा इतके प्रभावी ठरले आहेत की, तमाशा पाहून गेलेल्या प्रेक्षकांच्या तोंडी कित्येक दिवस ते घोळत असावेत. याचे सुंदर उदाहरण म्हणजे 'माझी मुंबई' या सुप्रसिद्ध लोकनाट्यातील झगडे हे होय. मुंबई शहर महाराष्ट्राला न जोडता स्वतंत्र ठेवावे असे प्रतिपादन करणारे शेटजी, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणाऱ्या विष्णूला विचारतात,

"नाना भाषेची । नाना जातीची ।
तूच मागशी कशी हिला ?

विष्णू : जशी गरूडाला पखं आणि वाघाला नखं ।
तशी ही मराठी मुलखाला ।।२।।

शेटजी : आम्ही येऊन मुंबईला । व्यापार वाढवला ।
पैसा पेरिला का बोला ? ।।

विष्णू : नदीला बगळा । जमून सगळा ।
टपून बसतो कशाला ? ।।[८]

यांतील विष्णूची विधाने तत्कालीन काळात संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीची एक राजकीय घोषणाच होऊन बसली आणि यातच अण्णाभाऊंच्या तमाशांचे वैशिष्ट्य आहे.

मराठी रंगभूमीच्या ऱ्हासाची कारणे सिनेमाचे आगमन, थिएटरांची दुर्मिळता इ. गोष्टीत शोधणाऱ्या नाटककार, कलाकारांनी तमाशाच्या बाबतीत अण्णाभाऊंनी अवलंबिलेल्या मार्गाचा अभ्यास करावा ते योग्यच ठरेल. अण्णाभाऊंनी जनतेला सुपरिचित व प्रिय असलेल्या तमाशाच्याच जुन्या ढाच्यात नवे लोकशाही अंतरंग ओतून जनतेच्या लोकशाही स्वातंत्र्य चळवळीशी आपल्या कलेची सांगड कशी घातली व ऱ्हास पावलेल्या किंवा भ्रष्ट झालेल्या महाराष्ट्रीय तमाशाला मराठी जनतेत पुन्हा मानाचे स्थान प्राप्त करून दिले. लोकनाट्यातून सामाजिक आशय आणला आणि त्यातून वर्गसंघर्षाचा नव्या प्रागतिक विचारांचा प्रसार करुन वर्गजागृती घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य

त्यांनी केले. ही त्यांची लोकनाट्ये तत्कालीन गरज म्हणून त्यांनी लिहिली असली तरी त्यांचे कलामूल्य, त्यातील रंजकता आजही रसिक मनाची पकड घेताना दिसते.

अशी ही काळानुरुप बदल करुन साकारलेली कला निश्चितच चिरंतन मूल्य प्राप्त करते. 'वैजयंता' या कादंबरीमधूनही अण्णाभाऊ ठिकठिकाणी तमाशाच्या ऱ्हासाची कारणे व त्याविषयीची चर्चा करतात. या दृष्टिने वैजयंताच्या कथानकाच्या अनुषंगाने हा विचार विस्तृतपणे मांडता येईल.

**०६. 'वैजयंता' कादंबरीचे कथानक :**

इ. स. १९५९ मध्ये लिहिलेली अण्णाभाऊंची 'वैजयंता' ही कादंबरी स्त्रीप्रश्नांची मांडणी करणारी 'चंदन'सारखीच आणखी एक कादंबरी आहे.

अण्णा भाऊ साठे सुद्धा कलावंत म्हणून जीवन जगले होते म्हणूनच कलावंताच्या जीवनप्रश्नावर प्रकाश टाकणारी ही मराठीतील पहिली कादंबरी असल्याचे मत डॉ. गुरव यांनी मांडले आहे.९

अण्णाभाऊ स्वत: शाहिर होते, कलावंत होते. कलावंताच्या अडचणी अण्णांनी स्वत:ही भोगल्या होत्या. म्हणून कलावंताचे प्रश्न अण्णाभाऊंचे स्वत:चे प्रश्न होते.

तमाशाकलावंत गजराबाईच्या पोटी जन्मलेली सुंदर, हुशार वैजयंता आपल्या नुपुरांनी प्रेक्षकांना डोलवत होती. सुंदर वैजयंताच्या जोडीला चंद्राही तोडीस तोड होती. आपल्या वैजयंतानं तमाशात नाचू नये अशीच आईची इच्छा होती. तिच्या वाट्याला आपल्याला आलेली उपेक्षा, व्यथा येऊ नये, तिने शिक्षण घेऊन लग्न करुन सुखाचा संसार थाटावा आणि आपण तो पहावा अशी तिची इच्छा होती. पण, तरुण सुंदर चंद्रापुढे गजरा कमी पडत होती. तेव्हाच प्रेक्षकांसमोर चंद्रा गजराचा अपमान करते. एकेकाळी नृत्यसम्राज्ञी म्हणून गाजलेल्या तिच्या कलावंत मनाला त्या उपेक्षेची अपमानाची ठेच लागते आणि मनाने दुखावलेली, खचलेली गजरा रंगमंचावरुन पायउतार होते. पण त्याच रंगमंचावर मनातल्या मनात या सुडाचा बदला घेण्याचा निश्चय करते. त्यासाठीच तिने वैजयंताला फक्त एकदाच तमाशात नाचण्याचा आग्रह केलेला असतो. त्यामुळे वैजयंताही नाचते तेव्हाच आईच्या घुंगरांचा ठेका ऐकतच लहानाची मोठी झालेली वैजयंता आपल्या सौंदर्याने व नृत्याने सर्वांनाच वेड लावते. त्यामुळे तिची आई गजराबाईला सूड घेतल्याचे समाधान मिळते पण, वैजयंताला मात्र उमाने 'तमाशात नाचू नको' म्हणून सांगितल्यानंतरही तिच्या नाचण्याने तो रुष्ट होतो. अनेक थिएटरमालकांची तिच्यावर नजर पडते त्यामुळे तिला स्वत:ला या सगळ्याचा तोटाच होतो. उमाचे आई-वडिल म्हणजेच पूर्वाश्रमीचे तमासगिर ज्योती आणि हौसा हे सुद्धा बाप

नसलेल्या वैजयंताला सून करुन घेण्यास नकार देतात. चंद्राच्या अपमानामुळे गजरानेही तमाशात काम करणे सोडून लोकांची धुणी, भांडी करण्याचे काम ती करीत असते. पण ते ही अचानक आजारी पडल्यामुळे थांबते. त्यामुळे आर्थिक परिस्थिती खालावलेली असते. नाइलाजास्तव घरच्या परिस्थितीमुळे पुन्हा वैजयंताला तमाशात नाचावेच लागते; आणि सुंदर वैजयंता आपला प्रियकर उमाचे मन मोडून तमाशात नाचून पहिल्याच फेरीत चंद्रा नर्तकीला गारद करते. वैजयंताच्या आगमनाने तमाशा जगताला व कॉन्ट्रॅक्टर बाबालाल, त्याचा मुलगा चंदुलाल या सर्वांनाच नवे पैशाचे झाड प्रकटल्याचा आनंद होतो. तमाशात नाचणारी बाई आपल्या हक्काचीच असते अशी समजूत असणाऱ्या चंदुलालची बुभुक्षित नजर वैजयंताच्या सुंदर शरीरावर खिळते तेव्हा तिच्या एकदाच नाचण्याने तिचे अनेक शत्रू निर्माण होतात. आई आजारी असताना वैजयंता ज्या घरी भांडी घासायला जाते तेथेही सुरेश नावाचा तरुण तिच्या तारुण्यावर हात टाकण्याचा प्रयत्न करतो. शेवटी घरची परिस्थिती, पोटाची भूक, वासनाने भरलेल्या पुरुषी नजरा या सर्व चक्रात अडकलेली वैजयंता स्वत:च्या प्रेमाचे बलिदान देण्याचे ठरविते आणि तमाशात नर्तकी होते. परसू व गंगू यांना बरोबर घेऊन आपला स्वतंत्र फड उभा करते. इकडे उमाही प्रेमनिराशेने उद्‌ध्वस्त होऊन शाहीर म्हणून चंद्रा नर्तकीच्या फडात सामील होतो. दोन फडात स्पर्धा, चुरस कंत्राटदाराकडून लावली जाते व पोटासाठी नाचणाऱ्या कलवंतांना स्पर्धेत उतरुन जीवघेणा संघर्ष कंत्राटदार, थिएटरच्या मालकांमुळे करावा लागतो. चंदूलाल व खुंदलापूरच्या आबा पाटील वैजयंतासाठी वेडे होतात.पहिल्याच दिवशी चंदूलालला तिने ओळखलेले असते; पण जंगीदादाच्या साहसामुळे ती सुटते. पुढे चंद्राच्या मदतीनेही वैजयंतावर हात टाकण्याचा प्रयत्न चंदुलाल करतो. पण तेथे अपयशी होतो. पुढे बळीच्या मदतीने कारस्थान रचून वैजयंताला आपल्या खोलीवर बोलवितो पण तिथेही बळीनेच तिला सावध केल्याने ती वाचते. या सर्वांमुळे वासनेने व क्रोधाने संतापलेला चंदुलाल बळीच्या खोटया जबाबामुळे जंगीदादाचा खून करतो व आपल्या गुन्हेगार मित्रांबरोबर दहा वर्षाच्या सक्तमजुरीच्या शिक्षेवर तुरुंगात जातो. या काळात वैजयंताला पैसा, प्रसिद्धी, प्रतिष्ठा मिळते. उमा आणि वैजयंताचे संबंध याही परिस्थितीत सुधारत नाहीत. पुढे खुंदलापूरच्या यात्रेत दोन तमाशाची जुगलबंदी दत्तू सवाखंडे व आबा पाटील (धमाल) यांच्याकडून लावली जाते. वैजयंता-परसू आणि चंद्रा-उमा अशी ती जुगलबंदी होणार असते. त्याच रात्री चंदूलाल दत्तू सवाखंडेच्या मदतीने तुरुंगातून सुटून वैजयंताचे नाक कापून तिच्यावर बलात्कार करण्याच्या इराद्याने आबा पाटलाच्या मळ्यात हजर होतो. पण तेथे वैजयंताचे उग्र स्वरुप व तिची निर्भय मूर्ती व तिने चंदुलालची केलेली निर्भत्सना यामुळे पश्चातापदग्ध चंदुलाल तिला काहीच न करता निघून जातो व शेवटी आत्महत्या करतो. प्रत्यक्ष

यात्रेत वैजू-परसू, उमा-चंद्रा अशी जुगलबंदी सुरु होते. पण सव्वाखंडे पार्टीने चंद्राला दारु पाजल्यामुळे ती सरळ स्टेजवर उभी सुद्धा राहू शकत नाही. त्यामुळे सव्वाखंडे-धमाल यांच्यात दंगा पेटतो. शेवटी दंग्यात मारामारी होऊन कोणाचा जीव जावू नये म्हणून वैजयंता जिंकली असली तरी उमा तिच्या स्टेजवर येतो आणि दोघे मिळून संयुक्त असा पारंपरिक मोहना बटावचा वग लोकांसमोर सादर करतात. यामुळे वैजयंता व उमा यांच्यातील खूप दिवसांची ताटातूट नाहीशी होते व त्या दोघांचे मनोमीलन होते. शेवटी वैजयंताने पाहिलेले उमाबरोबरच्या सुखी संसाराचे स्वप्न खरे होते व तिच्या कानात उद्याच्या सनईचे सूर घुमू लागतात व ती अधिकच लाजते.

'वैजयंता' या कादंबरीच्या कथानकातून प्रस्तुत कादंबरीतील कलावंतांच्या अडचणी दृग्गोचर केल्या आहेत.

## ०७. थिएटरमध्ये अडकवलेली तमाशा ही कला :

'तमाशा' कलेवर मक्तेदारी व मालकी असणाऱ्या कंत्राटदारांनी, सावकारांनी तमाशा थिएटरमध्ये अडकवला, त्याला लोकांमध्ये येऊच दिले नाही; आणि अशी ही लोकांचीच कला लोकांपासून दूर नेऊन चार भिंतीत बंदिस्त करण्याचा प्रयत्न कंत्राटदारांनी स्वत:च्या स्वार्थासाठी केला. एखादी सुंदर स्त्री त्यांच्या पाहण्यात आली की, ते तिला पैशाचे आमिष दाखवितात आणि आपल्या थिएटरमध्ये आणून तिला कला सादर करायला लावतात.

तमाशात काम करणाऱ्या स्त्रियांबरोबरच्या कंत्राटदारांच्या हावभावांवरुन त्यांच्या वृत्तीची प्रचिती येते. वैजयंताच्या तमाशात एकदाच नाचण्याने तिने सर्वांना वेड लावलेले असते. त्यामुळेच कंत्राटदार बाबालाल शेठ, खुंदलापुरचा तमाशावेडा आबा पाटील वैजयंताच्या पुढे तिचा स्वत:चा फड उभा करण्यासाठी मनधरणी करीत असतात. बाबालाल शेठ वैजयंताला म्हणतो, ''पोटात सुगंधी कस्तुरी घेऊन वनात भटकणाऱ्या मृगासारखी तुझी अवस्था झाली आहे. तू जर आपला फड उभा केलास, तर पब्लिक तुला डोक्यावर घेईल ! ...''[१०]

यातून बाबालाल शेठला सुद्धा पैसा कमावता येणार होता. म्हणजे चांगली स्त्री मिळविण्याकडे या कंत्राटदारांचा कल असतो. तिची स्तुती करायची, तिला अमिष दाखवायचे आणि आपण पैसा कमवायचा खरे तर, बाबालाल हा मुळचा अंडी विकणारा त्या धंद्यात दिवाळं निघाल्यामुळे तमाशाचं थिएटर सुरु करण्याची कल्पना त्याला सुचते. म्हणूनच, तो चंद्राच्या जोडीला सुंदर स्त्रीच्या शोधात असतो व वैजयंताच्या रुपाने ती त्याला सापडते आणि तिच्यामागे 'तू शिधा किती घेणार ?' असा तगादाच लावतो. आबा पाटीलसुद्धा तिच्या आगमनाची वाटच बघत असतो. बाबालाल शेटसुद्धा

परसू आणि गंग्याच्या मदतीने तमाशाचा फड उभा केलास तर, भरपूर पैसा तुला प्राप्त होईल; मलाही चार पैसे मिळतील; त्याच आशेने वैजयंताच्या पाठीशी लागलेले असतात. याचा अर्थच असा की, तमाशात काम करणाऱ्या कलाकारांना थिएटरचे मालक बांधून ठेवतात. परसूला बाबालालशेठचा राग येतो, उशीराने तो बोलतो,

"तमाशा, तमासगीर यांना या थेटरवाल्यांनी समूळ नष्ट केलं आहे ..... ज्या बाईवर पैसा मिळण्याची खात्री असते, त्या बाईचा हे असाच पिच्छा पुरवतात." (पृष्ठ. क्र.४४)

वैजयंताच्या होकारानंतर बाबालाल शेठ तर नाक्यावर बोर्डच लावतो,

"लौकरच येणार । लक्षात ठेवा ।
तलम भरजरी घडी घेऊन वैजयंता पुन्हा
येणार ? तुम्हीही न चुकता या. परंतु -
जरा दिल को संभाल के -- " (पृ. क्र. ६०)

बाबालाल शेठच्या या बोर्डाचा अर्थ काय निघतो, थिएटरमध्येच तमाशा बंदिस्त झालेला आहे. कंत्राटदार, थिएटर मालक हजारो रुपयांची कमाई ते या कलाप्रकारावर करतात आणि तमाशा कलावंताला मात्र, जुजबी रक्कम दिली जाते. हे खऱ्या अर्थाने तमाशामध्ये काम करणाऱ्या कलावंतांचे शोषण आहे. या शोषणाचे संयत दर्शन साठे यांनी या कादंबरीमधून घडविले आहे. ते त्यांच्या प्रस्तुत कादंबरीचे वैशिष्ट्यच आहे. थिएटरमध्ये कलेला कोंडल्यामुळे कलावंतांचे सर्व बाजूंनी शोषणच होत होते; आणि कलेचीही घुसमट होते. म्हणूनच, उमा-वैजयंता शेवटी लोकांची-कला लोकांच्यात सादर करतात.

खुंदलापुरला तमाशा करण्यासाठी गेलेल्या वैजयंता-परसू यांच्यामध्ये तमाशा या कलेविषयीची चर्चा होते तेव्हा अण्णाभाऊ म्हणतात,

एकेकाळी या महाराष्ट्रात तमाशा नि जनता यांचे संबंध निराळे होते. कोणत्याही गावात जाऊन तमासगीर पाटलाकडे हजेरी लावीत असत नि तो पाटील लगेच त्यांना शिधा म्हणून धान्य देत असे. मग गावात तमाशा आल्याची दवंडी लोकांना जमवीत असे. सारा गाव तमाशा बघून संतुष्ट होई आणि तमासगिरांना लोक इनाम देत. काही गावं तर आपल्या गावच्या तमासगिरांना बैता पोसावा, तसा पोशीत असत. म्हणजे जनतेची कला सादर करणाऱ्या तमासगिरांना ही जनताच जिवंत ठेवी आणि तमासगीर तमाशाला जिवंत ठेवीत आणि अशी ही लोककला जतन केली जात

असे. पण तमाशाची सद्य:स्थिती वेगळी असल्याचे परसू वैजयंताला सांगतो, अलिकडे तमाशाला कंत्राटदारांनी कनातीत कोंडला असून तो चवचाल प्रेक्षकांसाठीच केला जात आहे. कंत्राटदार सांगेल तसा तमाशा करुनच ही कला मरु लागली आहे. हा कलाप्रकार मैदानी आहे, तो मैदानातच वाढतो. म्हणून कलेच्या उद्‌धारासाठी बाबालाल शेठचे थेटर वैजयंता-परसू सोडतात. शेवटी उमा ही वैजयंताला लिहिलेल्या पत्रात अशाच प्रकारचा विचार मांडतो की मी ही आता थेटरात तमाशा करीत नाही. ही मैदानी कला कनातीत कोंडून वाढणार नसल्याचे स्पष्ट करतो. फडात एकोपा नसल्याचेही सांगतो. म्हणूनच चंद्राच्या वागण्यामुळे सव्वाखंडे व धमाळ यांच्यात सुरु झालेली दंगल थांबविण्यासाठी तो चंद्राचा फड सोडून वैजयंताच्या स्टेजवर येतो. व आम्ही तमासगीर एक आहोत. कला एक आहे. तुम्ही कटून मरु नये. उमा नि वैजयंता दोन नाहीत. अशाप्रकारे 'तमाशा' हाच ज्यांच्या ताटातुटीला कारणीभूत ठरतो व तीच कला शेवटी दोघांचेही मनोमिलन घडवून आणते.

या सर्व विश्लेषणात्मक विवेचनातून अण्णाभाऊंचे त्यांच्या 'तमाशा' या कलेवर असलेले नितांत प्रेम दिसते, तिचा विकास, उद्‌धार व्हावा. यासाठी ते प्रयत्न करतात. या तमाशा कलावंतांना समाजात प्रतिष्ठा मिळावी. स्त्री कलावंतांना स्त्री म्हणून भोगवस्तू न बनवता तिचा कलावंत म्हणून स्वीकार करावा. तरच या स्त्रियांचे दिवस पालटतील असे ते सांगतात.

## ०८. 'वैजयंता' कादंबरीतील स्त्री स्वरुप विचार :

'तमाशा' म्हटले की, यात सुंदर स्त्री ही अपरिहार्य घटक असते. 'वैजयंता' या कादंबरीतही अण्णाभाऊंनी वैविध्यपूर्ण असे स्त्रीचित्रण केले आहे. तमाशात कलावंतांमध्ये स्पर्धा लावली जाते. तशीच स्पर्धा या कादंबरीतही पहायला मिळते. कोणत्याही भांडवली समाजव्यवस्थेत स्पर्धा असतेच व दुसऱ्याचा द्वेष केल्याशिवाय माणूस स्पर्धा जिंकूच शकत नाही. या स्पर्धेपोटीच माणूस बेभान होतो, ईर्षेला पेटतो व परिणामी आयुष्याची राखरांगोळी करतो. चंद्रा-गजरा यांच्या कलगी तुऱ्यात गजराला चंद्राकडून अपमान सहन करावा लागतो. त्याचवेळी त्यावर सूड उगवण्याचा निश्चयही गजरा करते. चंद्रा म्हणते, ''माझ्या जोडीला बैल चांगला नाही. मी म्हाताऱ्या बैलाबरोबर ह्यो औत एकटी कशी ओढू ?'' (पृ. क्र. २७)

हा विनोदाचा भाग समजून प्रेक्षक हसले पण, एकेकाळची नृत्यसम्राज्ञी असलेल्या गजराचे हृदय त्या शब्दांनी रक्तबंबाळ होते. चंद्राने भर फडातून जणू हाकलूनच दिले होते. त्याचवेळी चंद्राच्या क्रूर कृत्याचा सूड घेऊनच मरण्याची ती प्रतिज्ञा घेते. पण, हीच सूडबुध्दी तिच्या मुलीसाठी

वैजयंतासाठी उमाबरोबरच्या सुखी आयुष्याची राखरांगोळी करणारी ठरते. म्हणूनच, साळवे या कादंबरीविषयी लिहिताना म्हणतात, ''वैजयंता ही अण्णाभाऊंची कादंबरी म्हणजे भांडवली व जातीय व्यवस्थेचा ऊर्मी प्रहार आहे.''[११]

अशा या भांडवली व्यवस्थेची शिकार बनलेल्या चंद्रा व गजरा आहेत. चंद्रा यातील कंत्राटदारांना, पुरुषांना पूर्ण बळी गेलेली आहे.

गजरा हीचे सुद्धा स्त्री-दु:ख म्हणून वेगळे आहे. तमाशा फडातून बाहेर पडल्यामुळे पोटासाठी काही तरी काम करणे गरजेचे होते. म्हणूनच, एकेकाळची नृत्यसम्राज्ञी मोलकरीण होते. लोकांची धुणी-भांडी करायला लागते. एक आई तिची काळजी त्यापेक्षा वेगळीच आहे. आईचे मन नेहमीच वैजयंताची आपल्या मुलीची काळजी करीत असते. म्हणूनच स्वत: घेतलेला जीवनाच्या दाहकतेचा अनुभव आपल्या मुलीला येऊ नये म्हणून ती काळजी घेत असते व वेळोवेळी सावधही करत असते. मुलीच्या सुखी संसाराचे पाहिलेले स्वप्नही मोडून पडते. तमासगिरणीची मुलगी म्हणून आणि बापाचा पत्ता नसल्याने ज्योतीने उमाच्या पित्याने तिला सून म्हणून घ्यावयास नकार दिलेला असतो. ''आपण गरीब आहोत. आपला वाली नाही.'' (पृ. क्र. २९) असे वैजयंताला ती सांगते.

वैजयंताच्या एका दिवसाच्या तमाशात नाचण्याने भविष्यातल्या धोक्याची जाणीव तिला झाली होती. म्हणूनच ती वैजयंताला म्हणते, ''तमाशाला येणारी सारीच माणसं वाईट नसतात. पण, सारीच चांगलीही नसतात. त्यांच्यापासून आपण दूर असावं ---- सोन्याप्रमाणे माणूस पारखावं !'' (पृ. क्र. २०).

या सर्व गजराच्या सांगण्यापाठीमागे एक स्त्रीचे, आईचे हृदय होते. वैजयंतानं सावध असावं. कुणी तिला फसवू नये कारण, गजरानं या तमाशात स्वत: डागण्या घेऊन अनुभव घेतला होता म्हणूनच आज वैजयंताला तिचा बाप कोण ? हे ती सांगू शकत नव्हती. आपल्या वैजूनं वाकड्या वाटेनं न जाता सरळ गरतीसारखा संसार करावा. तो आपण पहावा, एखादं नातवंड खेळवत डोळे झाकावे असे तिला सारखे वाटते.

हीच स्त्रीसुलभ भावना 'वैजयंता' या कादंबरीतील स्त्रियांच्या बाबतीत अण्णाभाऊ स्पष्ट करतात. म्हणूनच, अण्णाभाऊंची नायिका, स्त्री ही केवळ भोगाचे साधन नसून, ती बरोबरीची जीवनसाथी आहे हा विचार ठळकपणे मांडते. अण्णाभाऊंच्या सर्वच कादंबऱ्यातील स्त्रियांप्रमाणे त्यांच्या 'वैजयंता' या कादंबरीतील स्त्री सुद्धा सुंदर आहे. तरुण आहे. तरीही अण्णाभाऊ या स्त्रियांचे वर्णन करताना त्यांच्या शरीरसौंदर्याबरोबरच त्यांच्या मनाच्या सौंदर्याचे, त्यांच्या परिस्थितीला तोंड देण्याच्या कणखरपणाचे, अन्यायाचा बदला घेणाऱ्या रणरागिणत्वाचेही वर्णन करतात.

'वैजयंता' कादंबरीत येणाऱ्या, गजरा, चंद्रा व वैजयंता या तीन पिढ्यातील स्त्रिया वेगवेगळा स्त्री स्वरुप विचार घेऊन येतात. यांतील गजरा ही अनुभवाच्या डागण्या मिळाल्यानंतर त्यातून सुधारण्याचा व आपल्या मुलीला त्यापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करते. तर, चंद्राही पूर्णपणे आपले शील, पावित्र्य, देह, सर्वस्व सर्व काही पुरुषांना अर्पण करणारी आहे. याचे तिला काही वाटत नाही म्हणूनच अशा स्त्रीचा शेवट हा अण्णाभाऊ आपल्या विचारसरणीनुसार पराभूत, अपयशी स्त्री असाच करतात. या दोघींच्याहीपेक्षा पूर्णपणे वेगळी 'वैजयंता' संपूर्ण कादंबरीत आपल्या कणखरतेचा, सौंदर्यात असलेल्या नम्रतेचा, धाडसाचा प्रत्यय देते म्हणूनच शेवटी ती विजयी होते.

स्त्री स्वरुपाविषयी लिहिताना हेच वाटते की, या स्त्रिया प्रेम करतात. साध्या, सरळ स्त्रीसुलभ अशाच त्यांच्या भावना आहेत. त्यांना संसार करावा असेही वाटते. तिला आई होण्याचीही इच्छा आहे. यातून आपल्याला लाभलेल्या स्त्रीजीवनाला पूर्णत्व यावे. या जीवनाचे सर्व हर्ष, आनंद तिला हवे आहेत. 'वैजयंता' कादंबरीतील हा स्त्रीस्वरुप विचार निश्चितच अलौकिक स्वरुपाचा वाटतो. म्हणूनच अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यात स्त्रीला शेवटी सर्व काही प्राप्त होणारे, सकारात्मक, आशादायी चित्र उभे करतात व केवळ जीवनातील मांगल्यावरच भर देतात, प्रकाश टाकतात.

**०९. वैजयंताच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष :**

'वैजयंता' या कादंबरीची नायिका वैजयंता ही पारंपरिक स्त्री जीवनाला, तिच्यावर होणाऱ्या अन्यायाला विरोध करणारी रणरागिणी आहे. कादंबरीच्या सुरुवातीपासूनच आपल्या सौंदर्याने, करारी वृत्तीने, नृत्यनैपुण्याने, हजरजबाबीपणामुळे ती कस्तुरी मृगाप्रमाणे सर्वांनाच भुरळ पाडते. म्हणूनच परसू तिचा पहिलाच तमाशा पाहिल्यानंतर म्हणतो, "तुझ्यात इतका हजरजबाबीपणा असेल असं मला वाटलं नव्हतं, ..... गायनासाठी गळा जसा आवश्यक असतो, तद्वतच कलेच्या आविष्कारासाठी खोल विचार, सुंदर देह आणि तितकीच जबर धमकही असणं जरुरी आहे." (पृ. क्र. १४).

वैजयंतावर फिदा असलेला चंद्रलाल जेव्हा वाईट विचार प्रकट करतो आणि बळीच्या घडी मोडण्याच्या विचाराविषयी जेव्हा ती ऐकते तेव्हा ती त्या बळीलाही सुनावते,

"जीभ सैल झाली ?"

"मग आवरा नाही तर रंडकी होईल ।"

"एक दात उरणार नाही. आपलं वय लक्षात घेऊन बोलावं !" ( पृ. क्र.१६)

पण, हीच वैजयंता जेव्हा तिचा प्रियकर उमाविषयी विचार करते तेव्हा मात्र भावूक होते. त्याने 'नाचू नको' म्हणतानाही आपण नाचलो याचे तिला खुप दु:ख होते. ती उमावर अगदी जिवापाड प्रेम करत असते. त्याचे सर्व काही ऐकत असते. दोघेही घर, शाळा, खेळ यांत एकत्र वाढलेले होते.

याच वैजयंतामध्ये लपलेला कलाकार स्टेजवर उतरल्याबरोबर प्रेक्षकांना धुंद करतो तेव्हा तिच्यावर दौलतजादा अदा करणाऱ्यांची दौलत घेण्यास ती साफ नकार देते. तेव्हा आबा पाटील 'किती घेणार ?' असा उलटा सवाल करताच वैजयंता म्हणते, "तिन्ही लोकीचं राज्यपद देऊ केलं तरी मी तिकडे येणार नाही -." (पृ. क्र.८)

चंदूलालच्या एकूणच चालीवरुन तो माणूस उथळ आणि हलकट असल्याचे तिने ओळखले होते. चंदूलालच्यामते तमाशात काम करणाऱ्या बायांनी त्याची ऊठबस करायची असा रिवाज पाळला पाहिजे व तशी अपेक्षा तो वैजयंताकडूनही करतो कारण त्याअगोदर गजरा व चंद्रा यांनी तो रिवाज पाळला होता. पण वैजयंतास तो रिवाज मान्य नव्हता. वैजयंताची बेपर्वाई चंदूलालला अपमानास्पद वाटत होती.

परसूला मात्र वैजयंताबद्दल अभिमान वाटत होता आणि त्याच्यामते वैजयंतासारख्या स्त्रिया जेव्हा तमाशात येतील तेव्हाच तमाशाचा उद्धार होईल, असे त्याचे मन सांगत होते. बाबालाल शेठसुद्धा वैजयंता ही काही इतर बायांसारखी धंदेवाईक नाचणारी नसल्याचे मान्य करत होता.

बाबालाल शेठला जेव्हा वैजयंताला जपण्याविषयी गजरा सांगते तेव्हाही वैजयंता म्हणते, मला जपायला मी काही लहान बाळ नाही. या बाबालाल शेठ सारखेच शेठ पालीपुढं विंचवानं नांगी टाकावी, तद्वत सर्व थिएटर-मालक वैजयंतापुढे दबून होते. कारण, "मुजोरी करणाऱ्या थिएटर-मालकाच्या थिएटरपुढं आपण फुकट तमाशा करु आणि थिएटर बंद पाडू."अशी धमकीच तिने दिली होती. (पृ क्र.७०).

हीच वैजयंता उमाच्या तमाशात जाण्याने दुखावलेल्या ज्योतीच्या बोलण्यानं, वर्तनानं अस्वस्थच होत होती. चंदुलालच्या जरबीला वैजयंताने न जुमानल्याने तो चिडत होता. त्याचवेळी जेव्हा तो वैजयंताला पब्लिकशी सरळ वागण्याविषयी सांगतो तेव्हा ती त्याला धाडसाने उत्तर देते, "मी सरळ तमाशा करीन नि सरळ जाईन. तमाशा म्हणजे माझ्या देहाचं नग्न प्रदर्शन नव्हे ! जनतेची मालकी माझ्या कलेवर आहे शरीरावर नाही !" (पृ. क्र. ७६).

इतर तमाशातील स्त्रियांप्रमाणे मला वागणे जमणार नसल्याचे ती सांगते मी इथं कसबीण म्हणून येत नाही. जर तमाशात कसूर झाली तर जनतेला मला फाशी देण्याविषयी ती धाडसाने सांगते. तमाशात नाचणाऱ्या बाईला आपल्या मालकीची समजणाऱ्या चंदूलालशी एवढ्या धाडसाने वागूनसुद्धा तिच्यामागचे संकट संपलेले नसते. त्यामुळेच तिला फसवून चंदुलाल पळविण्याचे प्रयत्न करतो. हे बळीकडून कळते तेव्हा मात्र फासेपारध्याच्या हातून सुटलेल्या हरिणीसारखी तिची अवस्था होते व ती पळतच सुटते. त्याचवेळी वैजयंता हातून सुटल्याचे कळताच चंदुलाल संतापतो व बळीच्या खोट्या जबाबामुळे जंगीदादाचा खून करतो. तेव्हा जंगीदादाविषयी कृतज्ञभाव वैजयंताच्या मनात येतो, आपल्यासाठी या ना त्या कारणानं एका समर्थ माणसाचा बळी गेल्याचे त्याची कत्तल झाल्याचे कळताच तिचे डोळे अश्रूंनी डबडबतात.

चंदुलालच्या दुष्कृत्यानं तिचे मन विटले होते. ''तमाशाच्या अधोगतीला हे कंत्राटदारच प्रामुख्यानं जबाबदार आहेत.''असे तिचे मत झाले आहे. (पृ. क्र.८७).

म्हणूनच 'तमाशा' ही लोकांची कला टिकवायची असेल तर आपण आपला तमाशा कनातीबाहेर मैदानात करावा. लोक देतील ते घ्यावं म्हणजे हे थिएटर-मालकांचे भुंगे टळतील, असं तिला एकसारखं वाटत होतं.

तमाशाचा हा विचार घोळत असतानाच उमा या आपल्या प्रियकराविषयीच्या जुन्या आठवणीत ती मग्न होत होती व आपली प्रेमाची दुनिया स्वप्नासारखी का विरली? कोणाचं चुकलं? काय चुकलं ? याचा निवाडा करीत निराश होत होती आणि तो नळावर भेटायला आल्यावर आपणच मूर्खासारखं टाकून बोलल्याने तिला पश्चातापदग्ध वाटत होते. त्याला विसरुन हे हृदय कुणाला देऊ? या सर्व प्रश्नांनी तिला भंडावून सोडले होते आणि तिला आपले स्वप्न दूर गेल्याचे दु:ख वाटत होते. अचानक एक दिवस उमाचे पत्र आल्यानंतर मात्र चरफडू लागते आणि 'राजा, मीच चुकले ! तू सागरासारखा अथांग, तुझा मला अंतच लागला नाही. तूच मला क्षमा कर.' यावरुन वैजयंतासारखी सतत तिला कब्जात घेऊ पाहणाऱ्यांविरुद्ध झगडणारी स्त्री उमासाठी कशी झुरत असते हेच दिसते. तेव्हाच उमाही पश्चातापाने पोळल्याचे जाणवते. तो चंद्राच्या वागणुकीबद्दलची नाराजीही व्यक्त करत असतो.

वैजयंताचे नाव दिवसादिवसाने गाजत असते. पैसा, प्रतिष्ठा, लौकिक तिच्या पायाशी लोळण घेत असतात पण नवीन वैरीही निर्माण होतात. जुन्या वैऱ्यांनी पिच्छा सोडलेला नसतो. आबा पाटील आपल्या खुंदलापुरच्या जत्रेत जेव्हा तिला आपल्या बाजूने उभा करतो तेव्हाच

सव्वाखंडेच्या माणसांनी उमा-चंद्राचा तमाशा आणलेला असतो. सव्वाखंडेच्या मदतीने चंदुलाल तुरुंगातून पळालेला असतो व वैजयंताचे नाक कापून तिची बेअब्रू करण्याच्या निश्चयानेच तो जेव्हा एकट्या वैजयंतावर घाला घालतो तेव्हाचेही वैजयंताचे उद्गार तिच्या व्यक्तिमत्त्वावर, गुणविशेषांवर प्रकाश टाकतात. चंदुलालला ओळखताच ती त्याला तू इथं का आल्याचे विचारते. घामाने भिजलेली, थरथर कापणारी, डोळ्यांत भिती भरलेली वैजयंता चंदुलालच्या डोळ्यांत बोचते. चंदुलालच्या डोळ्यांतून कामांध वासना उसळलेल्या असतात. जिवावर उदार झालेली वैजयंता बोलत असते, "क्षणिक सुखासाठी माझा बळीच जर तू घेणार असशील तर घे .... पण तुला खरं समाधान कधीच मिळणार नाही.... माझं हृदय अजिंक्य आहे आणि ते माझ्यापाशी नाही.... तू माणसांतून उठून जनावरात जमा झालांस । तू स्त्रीलंपट आहेस, वासना तृप्त करण्यासाठी वेडा झालास." (पृ. क्र.१३७-१३८)

वैजयंताचा असा भयंकर अवतार बघून चंदुलाल चकित होतो व आपल्याला जगण्याची रीतच कळली नसल्याचे मान्य करतो. या अशा परिस्थितीतही वैजयंता तिच्या उद्याबद्दल आशादायी असल्याचे दिसते. "उद्या मांगल्याचा, सज्जनांचा नि शूरांचा आहे." (पृ. क्र.१३८) हे वैजयंताचे उद्गार अण्णाभाऊंच्या विचारसरणीतून स्त्रीच्या मांगल्यपूर्ण, आशादायी चित्रणासाठी आलेले दिसतात.

अण्णाभाऊंच्या साहित्यातील सर्वच माणसे ही त्यांची आहेत म्हणून त्यांना ते कुरुप करु इच्छित नाही. त्यांच्या जगण्याच्या संघर्षावर अण्णांचा पूर्ण विश्वास आहे. म्हणूनच अण्णांच्या कोणत्याही कादंबरीचा शेवट सुखांत झालेला दिसतो.

येथे वैजयंताही त्यांनी अशीच अतीव सहानुभूतीने, तळमळीने चितारली आहे. म्हणूनच शेवटी उमा-वैजयंताची भेट होते व उमा म्हणतो, "आता गेल्याबरोबर उद्या प्रथम लग्न!" (पृ. क्र. १४८) आणि ती मोहरते. ती 'उद्या' ची वाट पाहू लागते. त्या उद्यात तिच्या जीवनाचं साफल्य सामावत होतं. तो 'उद्या' तिचे सौभाग्य, मांगल्य आणि नव्या जीवनाची सुरुवात घेऊन येणार असतो. म्हणूनच, कादंबरीचा शेवटही तो तिचा भाग्यशाली, अमृत वर्षाव करणारा 'उद्या' तिच्याकडे येत होता, नि ती त्याच्याकडे जात होती. असा अण्णाभाऊंनी केला आहे.

अशाप्रकारे, प्रत्येक प्रसंगात एखाद्या पहाडाप्रमाणे भक्कम उभी राहून आपले स्वप्न जपणारी वैजयंता ही आपले स्त्रीसुलभ जीवन जगण्यासाठी धडपडणारी आहे. या तिच्या पुरुषीवासनेविरुद्ध उभारलेल्या संघर्षात वैजयंताचे एक तमाशा कलावंत म्हणून स्त्री विश्व या कादंबरीत उलगडत जाते

व एक स्त्री कलावंत म्हणून तिच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष अण्णाभाऊंच्या विचारांच्या चौकटीतून वेगळ्या अंगाने कलाटणी घेऊन साकार होतात आणि वैजयंताची प्रतिमा आदर्श कलावंत व एक साधी सामान्य स्त्री म्हणून रसिक मनावर छाप टाकते.

**१०. तमाशाकलावंत म्हणून असलेले स्त्रीविश्व :**

सामान्य स्त्री जीवन जगत असताना स्त्रीला समस्यांना सामोरे तर जावे लागतेच पण, तमाशाकलावंत म्हणून असलेले स्त्री विश्व हे अधिक दाहक, भयानक वाटते.

गजराबाईने स्वत:च्या अपमानाच्या सूडासाठी जेव्हा वैजयंताला चंद्राच्या विरोधात उभे केले. त्या पहिल्याच प्रयत्नात वैजयंताने सर्वांना आपल्याकडे आकर्षून घेतलेले होते. त्यामुळेच वैजयंताचे सौंदर्य कोणत्याच पुरुषी नजरेतून सुटत नव्हते. बाबालाल शेठचा मुलगा चंदुलाल सर्व भाव डोळ्यांत घेऊन वैजयंताला न्याहाळीत, तिचा प्रत्येक अवयव टिपून घेत होता. त्याच्या बापाने त्याची दोन लग्ने लावली होती. तरी प्रत्येक नाचणारी बाई आपल्याच मालकीची समजत होता.

अशी ही तमाशाकलावंत असणाऱ्या स्त्रीची वेगळी व्यथा आहे. कारण तिला कलावंत म्हणून न स्विकारता एक स्त्री म्हणूनच नेहमी पाहिले गेले. हीच पुरुषी भावना नवीन स्त्री-मिळाल्यानंतर जुन्या कलावंत स्त्रीचा अपमानही करतो. तमाशाशौकीन प्रेक्षकांचा हा असा व्यवहार आणि त्यातच चंदुलालसारखे कंत्राटदार, थिएटर मालक तमाशात नाचणारी कलावंत स्त्री ही पोटासाठी नाचत असते. या तिच्या दुर्बलतेचा नि लाचारीचा फायदाच घेतात. तरीही तमाशाला न्याय मिळावा व या कलेचा उद्धार व्हावा यासाठी प्रयत्न करणारा बाबालाल शेठ मात्र वैजयंताप्रमाणे सर्व तमासगिरांनी आपल्या मुलांना या कलेत तरबेज केले तर या तमाशाचा उद्धार होईल असे म्हणून, वैजयंतासारख्या गुणी कलावंताचे कौतुक करत होता. तारुण्य, लावण्य आणि कला यांचा अपूर्व संगम असलेल्या कलावंत स्त्रियांना फसविणारे त्यांना जबरदस्तीचे मातृत्व देणारे पण त्यांच्या दातृत्वाचे धनी न होणारे सुद्धा अनेक महाभाग या स्त्रियांच्या आयुष्यात येतात व वैजयंतासारख्या अनेक मुलींच्या भविष्याची आणि आयुष्याचीही राखरांगोळी करतात पण, हे सर्व या कलावंतांना केवळ स्त्री म्हणून सहन करावे लागते, म्हणूनच आपल्याला सोसावे लागलेले हे दु:ख आपली मुलगी वैजयंताला सोसावे लागू नये म्हणून गजरासारखी आई, "माझ्याकडे येणारा जरी कोल्ह्यासारखा दिसत असला तरी तो वाघ असतो." (पृ. क्र. २४) या वास्तवाचे भान आणून देते, पण परिस्थितीपुढे हतबल झालेल्या आणि जगायचं आणि जगवायचं असेल तर, तमाशात नाचण्याशिवाय दुसरा पर्याय नसलेल्या वैजयंतासारख्या सामान्य स्त्रीचे सुखी जीवन जगू पाहणाऱ्या मुलीला आपल्या

प्रियकराचा अत्याचारही सहन करावा लागतो. हीच या अशा स्त्रियांची खरी शोकांतिका ठरते, त्यांना कलंकित म्हणूनच जगावे लागते.

चंद्रासारख्या स्त्रिया मात्र हे कलंकित जीवनही अगदी सहजपणे स्विकारतात, म्हणूनच ती अगदी सहजपणे हे सर्व सांगताना म्हणते, "तमाशाचं जीवन किती कष्टाचं असतं, स्टेजवर आई म्हणणारे, पण एकान्तात वासनाधीन होऊन दुष्टपणा करणारे तमासगीर यांनी आपल्यावर किती लोकांनी अत्याचार केले, परंतु आपण निर्भय आहोत." (पृ. क्र.३८)

या अशा चंद्रासारख्या बेफिकिर, मागेल ते देत फिरणाऱ्या स्त्रियांमुळेच बाबालालसुद्धा कबुली देतो की, "थेटराबाहेर बाया बसल्या तरच चार पैसे अधिक मिळविण्याचा संभव होता. परंतु कायद्यानं बंदी आणल्यामुळे कोणत्या बाईवर पब्लिक फिदा होईल हे पारखून, वैजयंतासारख्या हिरकणीवर पैसा उधळला जातो." (पृ. क्र.४२).

परसूसुद्धा आपला स्वतंत्र फड उभा करण्याच्या विचारात असताना त्यालाही सुंदर स्त्री मिळत नव्हती. नाचणाऱ्या बायका मुंबईसारख्या शहरात कमी नव्हत्या पण त्या सर्व थिएटर-मालकांच्या आहारी गेल्या होत्या.

केवळ तमाशात या स्त्रियांचे जीवन असुरक्षित आहे असे नाही आणि केवळ थिएटर-मालकच त्यांची पिळवणुक करतात अशीही गोष्ट नव्हती. सुंदर स्त्री दिसताच, बाहेरच्या समाजातही एका विशिष्ट नजरेचा सामना करावा लागतो. सुरेशसारखे सुशिक्षित म्हणवून घेणारे तरुण मोलकरीण म्हणून काम करण्यासाठी येणाऱ्या वैजयंतावर हात टाकण्याचा प्रयत्न करतात.

परिस्थितीमुळे एकेकाळची कलावंत मोलकरीण होते. या गजराच्या दु:खाच्या माध्यमातून व वैजयंतासारख्या नोकर म्हणून काम करणाऱ्या स्त्रीला शील नसते. त्यामुळे आपण तिला काहीही करु शकतो असा समज असलेल्या सुरेशसारख्या पुरुषांपुढे गजराचे दु:ख हे केवळ तिचे न राहता सर्वच स्त्रियांचे होते. तेच अण्णाभाऊंनी प्रातिनिधिकपणे मांडलेले होते. गजराच्या अपमानावरुनही हे लक्षात येते की स्त्री तरुण, सुंदर असेल तरच तिला मान मिळतो. तिचे तारुण्य, सौंदर्य संपले की तिला नाकारले जाते. अशी सुंदर, तरुण स्त्री असल्याशिवाय फडही उभे रहात नव्हते. थेटर-मालकही बाई बघूनच भाव ठरवत होता. ती जर मिळाली नाही तर, गंग्यासारख्या कलावंताला हातगाडी ओढून पोट भरण्याची वेळ येत होती. तमाशाकलावंत स्त्रियांनी मानानं जगावं, जगलं पाहिजे असा उच्च, उदात्त विचारही उमा चंद्राच्या वागणुकीला बघून व्यक्त करतो. आणि चंद्राच्या बेबंद, उथळ, चंचल वागण्याविषयी नाराजीही व्यक्त करतो.

अशाप्रकारे, चंद्रा, वैजयंता, गजरा या स्त्रियांच्या माध्यमातून तमाशा कलावंत म्हणून भोगावे लागलेले अन्याय, अत्याचार, कमी दर्जाची वागणूक, तिला व तिच्या शील पावित्र्याला पुरुषी, वासनाधीन, बुभुक्षित नजरांनी दिलेली डागणी हे स्त्री विश्व तर उलगडतेच पण त्याचबरोबर वैजयंतासारख्या करारी स्त्रीचे हतबलतेतही आपले शीलरक्षण स्वत:च करणाऱ्या बाणेदार स्त्रीचेही प्रेरणादायी चित्र अण्णाभाऊ रेखाटतात. हे स्त्रीविश्व उलगडतानाच अण्णाभाऊ जीवनावरही भाष्य करुन जातात.

''जीवनाच्या लाटेवर माणूस कस्पटाप्रमाणे तरंगत असतो. तो लाटेबरोबर वाहवतो, कोणत्या किनाऱ्याला लागणार याची त्याला कल्पना नसते.'' ( पृ. क्र.३९)

वैजयंताची स्थिती तशीच झाली होती. तिला जीवन दुर्धर वाटत होते. काहीवेळा जीवन म्हणजे काय ? जीवन कशाप्रकारचे असते ? या संदर्भातही अण्णाभाऊंचे निवेदन स्त्री व्यक्तिरेखांच्या संदर्भात महत्त्वाचे असल्याचे मला वाटते. जीवनाचा प्रवाह कधी कोणत्या टोकाला नेऊन उभा करेल हे सांगता येत नाही. 'फक्त एकाचवेळेस नाचले' म्हणणारी वैजयंता तिला तमाशाकलावंतच व्हावे लागते. जीवन हे असेच असते. घेतलेल्या शपथा, दिलेली वचने पूर्ण करणे शक्य होत नाही. जीवनात सुख मिळाल्यासारखे वाटते आणि दु:खाचाच प्याला समोर येतो. अन्य तमासगीर स्त्रियांचेच दु:ख वैजयंताच्याही वाट्याला येते पण, ती न डगमगता त्याचा मुकाबला करते. हे अण्णाभाऊंचे विचार जीवनाच्या केवळ दाहकतेला अभिव्यक्त करत नाहीत, जगण्याची प्रेरणाही देतात.

या तमाशाकलावंतांच्या मुलींच्या विवाहाचे प्रश्नही अनेक प्रश्न निर्माण करतात. जबरदस्तीतून लादलेले मातृत्वच सहन करताना त्या जीवाच्या दातृत्वाची जबाबदारी कोणीच घेत नाही. त्यातूनच वैजयंता व उमा यांच्या लग्नाला उमाचे वडील ज्योती विरोध करतात. वैजयंताचा जन्म कोणत्या परिस्थितीत झाला आहे हे ठाऊक असल्याचे सांगून वळचणीचं पाणी आढयाला नेऊ नका ?

हा जातीवंत तमासगिराचा फटका गजराच्या वर्मी घाव घालतो. यातून तमासगीरांमधील भेदाभेद उजेडात येतो. वैजयंताला वडील नसल्यामुळेच तीला नाकारले जाते. अशा अनेक मुलींच्या भवितव्याचे, संसाराचे प्रश्न अण्णाभाऊंनी प्रातिनिधिकपणे मांडले आहेत.

तमाशा कलावंतांना दारिद्र्याला सामोरे जावे लागते. तमाशात काम करणारे जे कलावंत असतात त्यांना आयुष्याच्या उत्तरार्धात अत्यंत हालाखीत जीवन व्यथित करावे लागते. असंख्य रसिक श्रोत्यांच्या मनाची करमणूक करायची, त्यांना काही काळ तरी विवंचनेतून बाहेर आणायचे

आणि शेवटी दारिद्रयात जीवन जगत रहायचे. या कलावंतांना पैसा फार कमी, शासनाचीही मदत नसते. त्यामुळे उर्वरित आयुष्य हालअपेष्टांनी भरलेले असते. गजराबाईवर शेवटी मोलकरणीचे काम करण्याची वेळ येते. ती आजारी पडते तेव्हा तिच्या जागी वैजयंता कामासाठी जाते. हजारो चक्षूंसमोर कलेच अलौकिक इंद्रधनुष्य निर्माण करणारी वैजयंतासुद्धा पहिल्यांदाच मोलकरीण होते. ज्यांच्या तरल नजरा अनेकांना भुईसपाट करतात. त्यांना पोट भरण्यासाठी भांडीसुद्धा घासावी लागतात. अण्णाभाऊ साठे कलावंत असल्यामुळे त्यांनी अशा प्रकारचे दरिद्री जीवन भोगले आहे. त्यातूनच या कादंबरीची निर्मिती झाली आहे.

## ११. अण्णाभाऊंच्या कादंबरीतून अभिव्यक्त झालेली स्त्री :

तमाशावर बेतलेल्या १९५९ मध्ये लिहिलेल्या 'वैजयंता' या कादंबरीतून तमाशा कलेचा प्रश्न न्यायिक बुद्धीने हाताळण्याचा प्रयत्न अण्णाभाऊ करतात.

तमाशा ही कलाच स्त्रीप्रधान. साहजिकच त्यामुळे स्त्रीला त्यात अनन्यसाधारण महत्त्व. पण हीच स्त्री अण्णाभाऊ क्षणभर करमणुकीसाठी आणत नाहीत तर तिच्या माध्यमातून स्त्रीवर केल्या जाणाऱ्या अन्यायाला वाचा फोडतात. स्त्री दु:ख जे अण्णांच्या अंत:करणात सलते आहे ते आंतरिक जिव्हाळ्याने मांडतात. त्यांना कुरुप बनवत नाहीत कारण अण्णाभाऊ स्वत:च म्हणतात, ही माणसं माझी आहेत, त्यांना विद्रूप करणे मला आवडत नाही. माणसांना वैफल्याच्या नावाखाली विद्रूप करु नये असे त्यांचे मत आहे. असा जगण्यासाठी धडपडणारा माणूस त्यांच्या लेखनाचा केंद्रबिंदू आहे. या माणसांवर व त्यांच्या संघर्षावर ते प्रेम करतात, त्यांच्या नायिका सत्‌शील व नीतीला जीवन मानणाऱ्या, असताशी आपल्या परीने संघर्ष करणाऱ्या म्हणूनच वाटतात. येथेच अण्णाभाऊंच्या विचारांची घडी घट्ट असल्याचे जाणवते.

ही स्त्री कधी खचून जाते, हतबल होते पण पुन्हा चंदुलालसारखे अत्याचारी समोर आल्यावर त्याच्यावर तितक्याच ताकदीने प्रहारही करते. ही तिची ताकद अण्णाभाऊंच्या जडणघडणीतच आहे. त्यामुळे ती त्यांनी पुन्हा जिवंत केलेल्या स्त्रीयांमध्ये आपोआपच जाणवते. शेवटपर्यंत अखंड झुंज देणारी व मानव म्हणून असणारे हक्क प्राप्त करुन घेणारी त्यांची या कादंबरीतील स्त्री शेवटी मोहना-बटावू या प्रेमवीरांचा वग एकत्र सादर करते व त्यांच्याप्रमाणेच स्वप्न साकार करण्याचा प्रयत्न करते. त्यात यशस्वीही होते. येथे अण्णाभाऊंनी स्त्रीप्रधान कादंबऱ्यांचा जाणीवपूर्वक केलेला सुखांत शेवट हा त्यांनी स्वीकारलेल्या तत्त्वज्ञानाचे प्रतिबिंब वाटते. म्हणूनच मार्क्सवादी विचारांच्या मुशीत तयार झालेल्या अण्णाभाऊंनी अपेक्षित परिणामाच्या दृष्टिने सत्‌चा विजय, असत्‌चा पराभव

घडवून आणला. यामुळेच 'पारंपरिक जीवन जगणाऱ्या स्त्रिया' व 'परंपरेला छेद देणाऱ्या स्त्रिया' हे डॉ. शिवाजी पाटील यांनी स्त्रियांचे केलेले दोन गट योग्यच वाटतात.[१२]

'वैजयंता' या कादंबरीतील वैजयंता तमाशात काम करताना चंद्रा व आपली आई गजराप्रमाणे तडजोड करत नाही. ती स्त्रीसुलभ जीवन जगण्यासाठी परिस्थितीशी झगडा देते व त्यासाठी शेवटी उमाशी लग्न करते. या कादंबरीत वैजयंताची स्वतंत्र अस्मिता तीची स्वतंत्रता अण्णाभाऊ शेवटपर्यंत कायम ठेवतात. म्हणूनच या नायिकेला महतत्ता प्राप्त होते. ही वैजयंता स्वतःच्या मनाने जीवन जगण्याचा प्रयत्न करते व जेव्हा या तिच्या अधिकाराला डावलले जाते तेव्हा ती खवळून उठून लढा देते. तिला वेश्या बनवू पाहणाऱ्या दुष्ट दुर्जनांचा सडेतोड मुकाबला करणारी सौदामिनी असल्याचे वर्णन तारा रेड्डी करतात.[१३]

सामाजिक परिवर्तनाचा मार्क्सवादी विचार घेऊन आलेल्या अण्णाभाऊंना ते परिवर्तन घडवून आणण्यास त्यांच्या या कादंबरीतील स्त्री नायिका हातभार लावते व नीतीशून्य अशा जगात नीती, सत् यांचे महत्त्वच स्वतःच्या झगड्यातून पटवून देते. ही स्त्री उदार, धाडसी, कर्तबगार कुठलीही कौटुंबिक पार्श्वभूमी नसलेली अशी आहे. तरीही ती सर्वांच्या मनात आपले एक विशिष्ट स्थान पक्के करते व अन्यायाचा प्रतिकार सतत करत राहण्याची शिकवण देते. 'वैजयंता' आणि तिचे कलावंत म्हणून असलेले जीवन अनुलक्षून लिहिलेली ही कादंबरी म्हणजे अनुभवलेल्या, भोगलेल्या, पाहिलेल्या जीवनाचे समरसून केलेले चित्रणच आहे. अशी वास्तवानुभूतीवर आधारीत कादंबरी अभ्यासल्यानंतर ही कादंबरी रंजनप्रधानतेकडे झुकल्याप्रमाणेही वाटते म्हणून डॉ. कऱ्हाडे या कादंबरीला फडके-खांडेकर युगातील पारंपरिक ढाच्याची कादंबरी म्हणतात.[१४] असे असले तरी, कथानकाला अनुकूल असे वातावरण, प्रसंग, व्यक्तिरेखा यामुळे कादंबरीला उठावदारपणा आलेला आहे.

ही कादंबरी पोटासाठी आपल्या कलेचा उपयोग करणाऱ्या स्त्रियांविषयीच्या प्रश्नांचे रेखाटन करते तशीच ती त्याविषयी प्रबोधनही करणारी आहे. परंतु, हे प्रबोधन कलेचा गळा दाबत नाही तर तिची बूज राखते म्हणूनच कादंबरीचे सर्व वाङ्मयीन गुण सांभाळून रंजनाबरोबर प्रबोधनही स्विकारले गेले आहे.

'वैजयंता' कादंबरीची नायिका तमाशात नाचणारी कलावंत असली तरी कंत्राटदारांच्या हीन प्रवृत्तीपासून आपले स्वत्व सुरक्षित ठेवण्यासाठी तिला अनेक दिव्यातून जावे लागते. ज्याप्रमाणे, सोन्याची परीक्षा अग्नितच होते त्याप्रमाणे हे स्त्रीचे जीवन लेखक रेखाटतात. यामध्ये ''सत्प्रवृत्तीचा

विजय आणि असत्प्रवृत्तीचा पराजय हे सनातन सूत्र अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यात असल्याचे''[१५] मत कऱ्हाडे व्यक्त करतात. या सूत्रानुसार असत्प्रवृत्तीच्या खलनायकाला पश्चातापदग्ध मन:स्थितीत आत्महत्याच करावी लागते.

## १२. समारोप :

अशाप्रकारे 'वैजयंता' या कादंबरीच्या माध्यमातून स्त्री रुपाचा निराळा आविष्कार अभ्यास करताना अनुभवण्यास मिळाला. या कादंबरीच्या कथानकाबरोबरच वैजयंताचे व्यक्मितत्त्वही विकास पावते. अधिक खंबीर बनते आणि याचा शेवट उमा-वैजयंताच्या सांसारिक प्रवास सुरु होण्यामध्ये होतो. असा हा सुखांत, मांगल्यपूर्ण शेवट कृत्रिम न वाटता अपरिहार्यच वाटतो. कलेला प्रधान भाग बनवून तमाशात काम करणाऱ्या कलावंताचा, त्यांच्या जीवनातील प्रश्नांचा एक कलात्मक पट अण्णाभाऊंनी वैजयंतामध्ये विणलेला आहे.

यातील स्त्री कलावंत तमाशातील सर्व स्त्रियांचे प्रतिनिधित्व करतात. या कादंबरीची नायिका एक कलावंत म्हणून जेव्हा प्रेक्षकांसमोर उभी राहते तेव्हा त्या प्रेक्षकांकडून कलेला डावलून ज्या अन्य गोष्टींची मागणी केली जाते त्यांना वैजयंतामधील कलावंत स्पष्ट नकार देते व त्या प्रेक्षकांची अभिरुची पातळी उंचावण्यासाठी धडपडत राहते. त्या स्त्रैण प्रवृत्तीच्या पुरुषांना बाणेदारपणे वैजयंताने केलेला विरोध, तमाशा कलावंतामधील जीवघेणी स्पर्धा, त्यांची एकमेकांना कमी लेखण्याची मानसिकता, तमाशा कलेतून वृद्धत्वामुळे निवृत्त झाल्यानंतर उर्वरित आयुष्यातील कलावंतांचे दारिद्रय, त्यांच्या हालअपेष्टा, गजराचे अपार कष्ट, रात्रं-दिवस कष्टाची विनाविश्रांती केली जाणारी कामे म्हणजे आजच्या युगातील ती गुलामगिरीच जणू वृद्धापकाळात तिच्या दैवी येणे, या सर्व टप्प्यांचा मार्क्सवादी विचारसरणीतून आविष्कार 'वैजयंता' या कादंबरीमधून अण्णा भाऊ साठे यांनी केला आहे. त्यांच्या आयुष्याच्या भूतकाळातील व्यक्तिरेखांना त्यांनी या कादंबरीतून अमरत्व प्राप्त करुन दिलेले आहे. एकूणच स्त्री चित्रणाच्या दृष्टिने ही कादंबरी अव्वल दर्जाची ठरते. याबरोबरच 'तमाशा' विषयी विचारप्रकटीकरण हा या कादंबरीचा प्राणभूत आशय पण यामध्ये त्याबरोबरच प्रणय चित्रणे, वातावरणाला प्रधान्य अधिक प्रमाणात येऊ लागल्याचे लक्षात येते. प्रसंग, वाक्ये यांचीही वेळोवेळी पुनरावृत्ती झाल्याचे अभ्यासाअंती जाणवते. तरीही त्यांच्या कादंबरीला स्वत:चीच ऐट असल्यामुळे आलेला ठसकेबाजपणा, ताजेपणा, अकृत्रिम भाषासौंदर्य यांच्याकडे दुर्लक्ष करुन चालणारं नाही. त्यामुळेच ५० वर्षानंतरही ही कादंबरी वाचकाला शेवटपर्यंत खिळवून ठेवण्यात यशस्वी होते.

## १३. निष्कर्ष :

१) 'वैजयंता' ही कादंबरी रंजनप्रधानतेकडे झुकणारी वाटत असली तरी या कादंबरीतून अण्णाभाऊंच्या लोकशाहिरी व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव कादंबरीला यश मिळवून देणारा ठरतो.

२) कादंबरीतील ठसकेबाजपणा, ऐटबाजपणा, ताजेपणा, प्रसंगातील गतिमानता, भाषेतील खुमासदारपणा स्त्री चित्रण बोलके करण्यास उपयुक्त ठरलेला आहे.

३) या स्त्रीनायिका प्रधान कादंबरीच्या माध्यमातून स्त्रीसुलभ स्वभाव विशेषांवर अण्णाभाऊ प्रकर्षाने लिहितात.

४) अण्णाभाऊ साठे हे परिस्थितीपुढे स्वत:चे बलिदान देणाऱ्या त्यागवृत्तीने भारलेल्या स्त्रीचे चित्र रेखाटतात.

५) समाजाने अबला मानलेल्या स्त्रीलाच अण्णाभाऊ आपल्या कादंबरीतून अनीती, असत् यांना नष्ट करणारी सबला स्त्री म्हणून चितारतात.

६) 'वैजयंता' ही कादंबरी म्हणजे पारंपरिक लोककला व कलावंत स्त्रीचे जीवन यांचा सुयोग्य संगमच वाटते.

७) 'वैजयंता' ही समोर उपस्थितीत प्रेक्षकांची अभिरुची पातळी उंचावण्यासाठी धडपडणारी खरी कलावंत स्त्री वाटते.

८) अण्णाभाऊंनी कलावंतांच्या समस्या पोटतिडकीने मांडण्यामागची तळमळ व उद्याच्या समाजजीवनातील उदात्त स्त्रीरुपाची स्वप्ने वैजयंता ही कादंबरी प्रकट करते व तिचे भावविश्व उलगडून दाखविते.

९) वास्तवाला कल्पकतेची जोड देताना जाणिवपूर्वक स्विकारलेली विचारसरणीच्या अनुषंगाने कादंबरीचा शेवट करण्याची भूमिका लेखकाचा आशावाद, पात्रांचे भविष्य व भवितव्य सांगतात.

१०) अण्णाभाऊंनी लढणाऱ्या, संघर्ष करणाऱ्या माणसांचा आशावाद जिवंत ठेवून शेवटी त्यांच्या आशावादाचा विजय घडवून आणल्यामुळे त्यांचे साहित्य सामाजिक, आर्थिक विषेमतेचा अंत करण्याची प्रबळ प्रेरणा घेऊन येते.

## १४. संदर्भ :-


| | | | |
|---|---|---|---|
| १) | साठे अण्णा भाऊ | : | 'वैजयंता', प्रस्तावना, मॅजेस्टिक प्रकाशन, आवृत्ती चौथी, पृष्ठ क्र.२. |
| २) | साठे अण्णा भाऊ | : | 'वैजयंता', प्रस्तावना, उनि. पृष्ठ क्र.१. |
| ३) | साठे अण्णा भाऊ | : | 'वैजयंता', प्रस्तावना, उनि. पृष्ठ क्र.२. |
| ४) | साठे अण्णा भाऊ | : | 'वैजयंता', उनि. पृष्ठ क्र.३. |
| ५) | साठे अण्णा भाऊ | : | 'वैजयंता', उनि. पृष्ठ क्र.४. |
| ६) | शितोळे खासेराव | : | 'शाहीर अण्णा भाऊ साठे हे ग्रामीण साहित्याचे जनक', केसरी वर्तमानपत्रातील लेख , १९ जुलै २००७, पृष्ठ क्र. ५. |
| ७) | पाटील दत्ता | : | अण्णाभाऊ साठे यांचे शाहिरी वाङ्मय, लेख - अण्णा भाऊ साठे आणि त्यांचे वाङ्मय, पंचगंगा प्रकाशन, मार्च २०००, पृष्ठ क्र. ५१. |
| ८) | साठे अण्णा भाऊ | : | नवे तमाशे, चंद्रकात शेटये प्रकाशन, कोल्हापूर १९८०, आवृत्ती दुसरी, पृष्ठ क्र. ५७. |
| ९) | गुरव डॉ. बाबुराव | : | अण्णाभाऊ साठे : समाजविचार व साहित्यविवेचन, लोकवाङ्मय गृह, दुसरी आवृत्ती १९९९, पृष्ठ क्र. ३८. |
| १०) | साठे अण्णा भाऊ | : | वैजयंता, पृष्ठ क्र.४१. |
| ११) | साळवे दिनकर | : | 'लोकशाहीर तथा लोकलेखक अण्णाभाऊ साठे' ग्रंथ, संपा. आसाराम गायकवाड, लेख - 'अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्यातील वर्गकलह', पृष्ठ क्र. १८६. |
| १२) | पाटील डॉ. शिवाजी | : | जननायक अण्णाभाऊ साठे ग्रंथ, लेख - अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यातील स्त्री समस्या, पृष्ठ क्र. १२९. |

१३) रेड्डी कॉ. तारा : जननायक अण्णाभाऊ साठे, ग्रंथ लेख - अण्णाभाऊंच्या मनस्वी नायिका, पृष्ठ क्र.१३५.

१४) कऱ्हाडे डॉ. सदा : 'दलित साहित्य चिकित्सा' ग्रंथ, लेख - दलित कादंबरी, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली २००१, पृष्ठ क्र. १००.

१५) कऱ्हाडे डॉ. सदा : शाहीर परंपरेतील 'सरताज' अण्णाभाऊ साठे - लेख 'लोकराज्य' विशेषांक, १ ऑगस्ट १९८५, पृष्ठ क्र. ७.

-----x-----